The South Asian Academic Research Chronicle ISSN 2454-1109
A Refereed Interdisciplinary Indexed International Open Access Monthly e-Journal
Vol 11.Issue1 & 2; Jan-Feb 2024

# संत साहित्य आणि प्रबोधन : संत गाडगेबाबा

डॉ. उमाकांत जाधव
संशोधक

'समाज प्रबोधनाच्या वाटा संत गाडगेबाबा आयुष्यभर उजळत राहिले. लोकशिक्षण, अंधश्रद्धा-निर्मूलन, श्रमप्रतिष्ठा, अस्पृश्यतानिवारण, दलित संवेदन आणि व्यसनमुक्तसमाज निर्मितीसाठी ते अखंड 50 वर्षे धडपडत राहिले. खरे तर गाडगेबाबा म्हणजे समाज प्रबोधनाचे एक चालते-बोलते- फिरते विद्यापीठ होते. माणूसकीच्या भावनेने ओथंबलेले हे विना-अनुदानित विद्यापीठ होते. माणसाने माणसासारखे जगावे, हाच बाबांच्या समाजप्रबोधनाचा केंद्र बिंदू होता.'

संत गाडगेबाबांचे मूळ नाव डेबू झिंगराजी जाणोरकर. जन्म 23फेब्रुवारी 1876 रोजी मु. पो. शेणगाव, जि. अमरावती येथे झाला. जात वट्टी म्हणजे परीट. झिंगराजी दारु पिऊनपिऊन झिंगत असे. त्याने घरादाराची वाट लावली. मरणाच्या दारात असताना त्याने आपल्या धर्मपत्नीस-सखूबाईस जवळ बोलाविले, म्हटले- "सखू माहा कारभार आटपला! मराले शेवटी मी लोकांच्या उंबरठ्यात ईऊन पडलो ! मेल्यावर मले जाळाले पैसा लाकाचाच ! कायन आली असील हे अवदसा? देवकाऱ्यांच्या दारूनं! काहाचे हे देव अन् काहांचे ते दगड गोट्याईचे देवकार? दारूच्या पाई घरदार, वावर जमीन, मान मरयद्याले सोडल्यानं आपल्या संसाराचे कोयसे झाले. आता माहा आईक. आत्ताच्या आता तो खंडोबा आन ती आसरा अन ते सर्वेच्या सर्वे देवपाटातले दगड गोटे दे फेकून भुलेसरीत! आखीन एक काम, आपल्या लाडाच्या डेबुले वारा नोको लागू देऊ त्या देवदेवीचा ! निर्भय राहू दे त्याले, या देव देवी अन् देवकाऱ्यांच्या पायापासून अरेरे! काहाचे हे धरम अन् कुयधरम? या खोट्या देवाईले कोंबडे बकऱ्या इनाकारन कापन्याच्या पापी फंदात मी पडलो नसतो तर दारुच्या नादात कायले गोयलो असतो? लोकाईले काहु न बदनामी देवावं? माझ्याजोळ पैशाईचा आसरो होता तंथुरीक मले त्याहीन दारूसाठी कोरलं. लोक असेच असतात सखू ! पन आता माझ्या डेबुजीले सांभाळवो बरं ! तो पिसाट देवाले न माननारा झाला तर बरं होईन पन त्याले या बकरेखाऊ अन् दारु पिऊ देवांचा नाद लागू देऊ नोको बरं !! असे म्हणून झिंगराजीने देह ठेवला. डेबू पोरका झाला !! त्यांच्या डोक्यावरचं प्रेमाचं आकाश फाटलं. आईच्या पदरी अकाली वैधव्य आलं. चारी बाजूनं संकटांची रांग लागली. शेवटी मायलेक दापुऱ्याला मामाच्या घरी स्थिरावले.

समाज प्रबोधनाचा चंद्र उगवला :

झिंगराजीने दिलेला संदेश डेबूच्या मनात रुजला. डेबू वाढू लागला. शेतीवाडी करू लागला. मोत्यासारखं धान्य पिकवू लागला. कापसाच्या गाठीच्या गाठी बांधू लागला. पण कापसाच्या गाठीच्या गाठी सावकाराच्या घरी जाताना पाहूनतो दुःखीेे झाला. सावकार आपले शोषण करतो, हे त्याला कळले. डेबूने बंडाचे शिंग फुंकले. मामाची पाचावर धारण बसली. डेबूचे सोळाव्या वर्षीच लग्न झाले. संसार केला. अलोका, मुद्गल,कलावती अशी तीन अपत्ये ही झाली. एके दिवशी डेबूने एक कीर्तन ऐकले.

"अजगर जनावर वारूळात राहे, त्याची चिंता वाहे नारायण
तो सकल जीवांचा करी सांभाळ, तुज मोकलील ऐसे काही"

हे ऐकून डेबूचे विचारविश्व जागे झाले. त्याच्या मनाला नवी कलाटणी मिळाली. सन 1905 साली डेबूने घर सोडले. मायेच्या बेड्या तोडल्या. जगाच्या अंगणात हिंडू लागला वर आकाश, खाली जमीन. जमिनीवर उभा राहून आकाशाला आपल्या कवेत घ्यावे आणि वाऱ्यासारखे सर्वत्र हिंडावे, असे डेबूने ठरविले. आपण आपणासाठी जगतो. यापेक्षा दुसऱ्यासाठी जगावे, असे विचारचक्र डेबूच्या मनात घोळू लागले. सर्वांच्या 'सुखाचे चांदणे' डेबूच्या मनात फुलू लागले. हळूहळू डेबूच्या मनात समाज प्रबोधनाचा चंद्र उगवला.

सर्वांच्या जीवनात आनंदाचे अंगण फुलवावे :

डेबूची भ्रमंती सुरु झाली. लोकांत मिसळावे. त्यांचे काम करावे. कामाचा मोबदला घेऊ नये. लोकांच्या पायाखालील रस्ते स्वच्छ करावेत. सर्वासाठी काम करत फिरत रहावे. कारुण्याने ओथंबलेल्या हृदयाने सर्वांच्या हृदयाशी एकजीव व्हावे. या हृदयाचे त्या हृदयी घालावे, हृदया -हृदय एक करावे, असा क्रम सुरू झाला. वेड पांघरून सर्वांसाठी डेबू राबू लागला. डोक्यावर गाडगे, अंगात चिंध्या-चिंध्यांचा अंगरखा, एका कानात कवडी तर दुसऱ्या कानात बांगडी. एका पायात तांबडा पायमोजा तर दुसऱ्या पायात पांढरा पायमोजा आणि हातात काठी असे ध्यान पाहून लोक डेबूला गाडगे बाबा म्हणू लागले 'गाडगे' म्हणजे माती. माती म्हणजे जीवनाचा शाश्वत आविष्कार. मातीतून जन्मलेल्या माणसाने मातीशी इमान राखून माणसांची सेवा करावी. हा पुण्यमार्ग बाबांना सापडला. सर्वांच्या जीवनात आनंदाचे अंगण निर्माण करावे हा सुविचार बाबांच्या मनात आला.

गाडगेबाबा कालीन सामाजिक परिस्थिती :

सन 1905 ते सन 1956 हा गाडगेबाबांच्या कामाचा कालखंड होय. बाबानी देश धुंडाळला. लोकनिरीक्षण केले. आत्मनिरीक्षण केले. बाबांनी उपाशी लोक पाहिले. उघडे-नागडे लोक पाहिले. रोगी लोक पाहिले. गरीब लोक पाहिले. शिकलेले आणि बिनशिकलेले लोक पाहिले. शिकलेले बिनशिकलेल्यांचे शोषण कसे करतात ते पाहिले. व्यसनाधीन लोक पाहिले. दुष्काळग्रस्त लोक पाहिले. शेतकरी मजूर लोक पाहिले. बकऱ्यांची कंदुरी करणारे लोक पाहिले. नवस-सायास, अभिषेक, दोरागंडा, शकुन-अपशकुन आणि देवपूजा करणारे लोक पाहिले. निरक्षर समाजाला छळणारे लोक पाहिले. बाबांचे अंत:करण हेलावले. माणसे, माणसांना विनाकारण दु:खाच्या खाईत का ढकलतात? समाजातल्या दु:खी लोकांचे दु:ख कशामुळे वाढले? श्रमिकांच्या घामावर श्रीमंत कसे सुखावले? गरीब लोक बेघर का राहिले? त्यांना दोन वेळचे अन्न का मिळत नाही? आजारी पडल्यावर त्यांना औषध का मिळत नाही? तथाकथित लोक खालच्या वर्गातील लोकांना का शिवत नाहीत? त्यांना आपल्या विहिरीवर पाणी का भरू देत नाहीत? श्रीमंत कसे श्रीमंत होऊ लागलेत? गरीब कसे गरीब होऊ लागलेत? अशा एक ना अनेक प्रश्नांनी बाबांचे मन व्यापले. लोकांच्या ठायी असलेल्या अज्ञानामुळे हे सर्व घडते, हे बाबांनी ओळखले. समाजातील गोर-गरिबांची दुरावस्था दूर करण्यासाठी 'ज्ञानदान' हाच रामबाण उपाय आहे, हे बाबांनी ओळखले.

एक जाणते लोकशिक्षक :

शिक्षण हा सर्व सामाजिक सुधारणांचा पाया आहे. विकासाचे साधन आहे. उन्नतीचा मार्ग आहे. असे शिक्षण समाजाच्या सर्व थरापर्यंत पोहचले पाहिजे, असे बाबांना वाटू लागले. बाबा एक निरक्षर माणूस अंगठे बहाद्दर, परंतु अज्ञानी लोकांविषयी वाटणाऱ्या प्रेमातूनच बाबांच्या मस्तकी ज्ञानगंगा अवतरली. खऱ्या ज्ञानासाठी ढीगभर वाचन लेखन करण्याची गरज नसते. ज्या ज्ञानातून जगण्यातल्या आनंदाचा 'राम' भेटेल तेच खरे ज्ञान होय. म्हणून बाबांनी ज्ञानप्रसाराचे आंदोलन निर्माण केले. कीर्तनातून ज्ञानाची एक नवी चळवळ निर्माण केली.

कीर्तनाच्या रंगात नाचत नाचत बाबांनी ज्ञानदीप लावले. कीर्तनात बाबा म्हणत,"बाप्पा हो ,विद्या हे मोठं धन आहे. शिक्षणामुळे माणूस ,'माणूस 'म्हणून जगू शकतो. बिनशिकलेला माणूस आणि जनावर दोन्हीही सारखेच. शिक्षणामुळे माणसांच जीवन फुलतं. आपण कोण आहे, ते कळतं आपण काय केले पाहिजे, ते समजतं. शिक्षणाशिवाय माणसाला 'माणुसकी' येत नाही. तुम्ही शिका अन् आपले मुलाले शिकवा" असे बाबा कळकळीने सांगत असत.

गाडगेबाबा जातिवंत प्रज्ञावंत होते. विज्ञाननिष्ठ संत होते. जाणते जनता संत होते. खरे-खुरे लोकशिक्षक होते. बाबा कीर्तनात म्हणायचे "बाप्पा हो ! विद्या शिका. गरिबाले शिक्षणासाठी मदत करा. गरिबांच्या पोराले पाटी-पेन्सिल द्या. चड्डी टोपी द्या. शिक्षणाने माणूस 'माणूस' होतो, म्हणून मुलाले शिक्षण द्या. पैसे नाही म्हणाल तर जेवणाचे ताट मोडा. हातावर भाकरी खा. बायकोचं लुगडं कमी भावाचं घ्या. इवायाल्या पाहुणचार करू नका, पण आपले मुलाले शाळेत घातल्या विने सोडू नका. "बाबा कळकळीने पुढे म्हणायचे " हे बरेच लोक गरीबीत का राहिले. याहिले नाही विद्या. ज्याले विद्या नसेल त्याले खटाऱ्याचा बैल म्हटलं तरी चालेल. विद्या मोठं धन आहे, यातलेच माणसं दिल्लीच्या तख्त्यावर भाषण करतात. यातलेच माणसं बोरीबंदरच्या ठेसनावर पोते उचलतात, हे कांही बैल नाहीत न ? कोण आहेत? माणसं".

असे सांगून बाबा लोकांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत होते. शिक्षणातून समाजपरिवर्तन करत होते. बाबांनी ज्ञानप्रसाराचा यज्ञच मांडला होता. ज्या समाजात मूठभर लोक शिकलेले असतात आणि ढीगभर लोक अडानी असतात, तेथे जीवघेणा संघर्ष सुरू असतो. तो नष्ट करण्यासाठी सर्वांनाच शिक्षणाची गरज असते. 84 रोगांवर 'शिक्षण' हा एकच उपाय आहे, हे ओळखून बाबांनी शिक्षणप्रसाराचे कार्य केले. कर्मवीर भाऊराव पाटील आणि डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या शिक्षणसंस्थांना मदत केली. माणसातील माणूसपण जागे ठेवण्यासाठी बाबांनी आयुष्यभर शिक्षण प्रसाराचे काम केले. खेड्या-पाड्यांच्या उंबरठ्यापर्यंत ज्ञानगंगा पोहचली. खरे तर बाबा एक जाणते लोकशिक्षकच होते.

अंधश्रद्धा निर्मूलनाची काठी :

गाडगेबाबा द्रष्टे पुरुष होते. महापुरुष होते. महापुरुष द्रष्टे असतात, म्हणूनबाबांनी शतकानुशतके अंधश्रद्धेमध्ये पिचत पडलेल्या समाजाला जगे केले. बाबांच्या हातातील खराटा हा माणसांची अंतर्बाह्या स्वच्छता करणारा खराटा होता. आपल्या खराट्याच्या माध्यमातून बाबांनी व्यक्तिधर्म, कुटूंबधर्म, समाजधर्म आणि राष्ट्रधर्म समाजाला शिकवला. ग्रंथ प्रामाण्य आणि कर्मकांड बाबांनी नाकारले. मूर्तिपूजेला विरोध केला. तीर्थयात्रेतील शोषणाचा तिटकारा केला.सण ,श्राद्ध आणि पाथीनिष्ठा नाकारली.समाजातील परंपरागत प्रथा-परंपरा आणि धर्मकल्पना यांना तिलांजली दिली. सर्व समाज अंधश्रद्धामुक्त करायचा हाच खरा धर्म होय, असे मानले.कीर्तनातून समाजाला अंधश्रद्धामुक्त करण्यासाठी बाबा संत
तुकोबांचा दाखला देत म्हणत,

'शेंदुरमाखोनिया धोंडा ! पाया पडती पोरे रांडा !!
देव दगडाचा केला ! गंवडी त्याचा बाप झाला !!
देव सोन्याचा केला ! सोनार त्याचा बाप झाला !!
देव मातीचा केला ! कुंभार त्याचा बाप झाला !!

सोडोनिया खऱ्या देवा ! करी म्हसोबाची सेवा !!

पुढे संत कबीराचा पुरावा देत बाबा तीर्थयात्रा न जाताही सुद्धा एक अंधश्रद्धांच आहे असे सांगताना म्हणत की -

जत्रामे पत्थरा बिठाया | तिरथ बनाया पाणी ||
दुनिया भई दीवानी | पैसे की धुलधाणी ||

यात्रा, जत्रा म्हणजे भोळ्या भाबड्या लोकांना लुटण्याची दुकाने आहेत असे बाबांचे स्वच्छ मत होते. सत्यनारायण करणाऱ्या लोकांचे डोळे उघडावेत, म्हणून बाबा आपल्या कीर्तनात सांगत असत की, आता हा सत्यनारायण देव लोकांनी तयार केला आहे. चांगला सोयीस्कर देव आहे बरं का हा, सव्वा रूपयात हवा तो नवस पुरा करतो. मघाशी तुम्ही त्याची पोथी ऐकलीच असेल. त्या कलावती का लीलावतीच्या साधुवाण्याची बोट समुद्रात बुडाली. त्या साधुवाण्यानं सत्यनारायणाचा प्रसाद खाताच झटकन ती बोट आली पाण्यावर ! काय, आहे की नाही देवाचा चमत्कार ? गेल्या दोन महायुद्धात अनेक बोटी महासागरात बुडाल्या आहेत. आपल्या मुंबई बंदरात रामदास बोट बुडाली आहे. बापहो, कशाला सव्वा रूपया मागता? एक कोट रूपये देतो. सत्यनारायणाची पूजा करून ती बोट वर आणून दाखवावी. बोट वर येईल कां? नाही मग हा भोळसटांना ठकवून पैसे काढण्याचा लबाडीचा धंदा आहे. बाबा नवस सायासाला कडाडून विरोध करतात. देव कोणाला कांही देत नाही आणि देव आपल्याकडे कांही मागत नाही. असे असताना देखील पोरे व्हावीत म्हणत नवस करणाऱ्या लोकांना बाबा संत तुकोबाचा दाखला देत म्हणतात.

नवसे कन्यापुत्र होती ! मग का करणे लागे पति !

या जगात माणूस ही एकच जात आहे. हा महार, तो चांभार म्हणून त्याला शिवायचे नाही. ही अंधश्रद्धा नष्ट करण्यासाठी बाबा आपल्या कीर्तनातून कडक टीका करीत म्हणत,

बाबा - का हो भटजी महाराज तुम्हाला दात किती?
भटजी - 'बत्तीस'
बाबा - 'आन् अर्जुन मांगाला किती?'
भटजी - 'त्याला ही बत्तीस'
बाबा - 'का सत्तेचाळीस, अठ्ठेचाळीस आहेत?
लोक - 'नाही'

अभिषेक, यज्ञ आणि श्राद्ध अशा प्रकारच्या रूढीवर कीर्तनातून सपाटून टीका करत.भट-भिक्षुकांच्या लबाडीवर प्रकाश टाकत. "आम्हाला लाडू खाऊ घाला म्हणजे ते तुमच्या स्वर्गातल्या बापाला भेटतील" असे म्हणणाऱ्या भट-भिक्षुकांना धडा देण्यासाठी बाबा नदीत उभा राहून ओजंळीने काठावर पाणी फेकू लागले. एकाने विचारले 'हे काय चाललंय? 'बाबा म्हणाले बाप्पा हो, माझे वावरात पऱ्हाटी उभी आहे, तिले हे पानी देऊन राहिलो. तो इच्यारतो 'तुझं वावर कुठं आहे? तर म्या म्हणलं आहे इथून दहा कोसावर मग तो हासाले लागाला. त्याचं खरंच आहे. इथून दहा कोसावर पाणी कसं फेकता येईल? पण आता हे सांगा कीं, त्या बडव्या पंड्याच्या पोटातून लाडू कसे स्वर्गात पोंहचतील? स्वर्ग हे तर दहा कोसापेक्षा लयच दूर आहे.

अंधश्रद्धा निर्मूलनासाठी बाबांनी अखंड पन्नास वर्ष काम केले. लोकभाषेतून लोकांचे प्रबोधनकेले. आपल्या हाती अंधश्रद्धा निर्मूलनाची काठी घेऊन समाज मन विज्ञाननिष्ठ बनवण्याचा आटोकाट प्रयत्न केला. समाज प्रबोधनाच्या ऐरणीवर लोकभाषेच्या हातोड्याने अंधश्रद्धेच्या गाठी फोडल्या.

सर्व माणसे सारखीचः-

सर्व माणसे एकाच परमेश्वराची लेकरे आहेत अशी विचारधारा मनात बाळगून बाबा काम करत होते. आपले समाजप्रबोधनाचे तत्त्वज्ञान सांगताना बाबा कीर्तनातून म्हणत असत

"महारांचा जो देव तोच मराठया ब्राम्हणांचा
महार मांगाचे जे आकाश तेच गुजर-मारवाड्यांचे,
चांभार-भंग्याचा जो सूर्य तोच सर्वांचा,
का त्याचा वायला आहे?"

असे सांगून बाबा समाजाची कानउघाडणी करीत असत. बाबा आपल्या कीर्तनातून मानवतावादाचा संदेश देत म्हणत असत

आपले हिंदुस्थानालेमोठा एक डाग, तो डाग धुवूनकाढायचा प्रयत्न करा.
तो डाग कोणता?
शिवशी s ल !
तु कोण? जांत पुसण-ज्याच्या अंगात अभिमान आहे
तो जात पुसते.
तू कोण? जो जात पुसते त्याच्यासारखाच तो आहे कीं नाही?
हो s य !
याले चार हात अन् त्याले दीड हात आहे कां? बोला.
ना s ही
याले चार डोळे आहे, त्याले दोनच आहेत, असं आहे कां?
ना s ही
यालेचार पाय आहेत अन् त्याले एकच तंगड आहे असं आहे कां ?
ना s ही

मंग तू कोण कां पुसता ? कोणी तुमाले जात विचारील तू कोण, तर म्हणावं मी माणूस, कोण आहात तुम्ही?

मा s णूस !
कां म्हैस आहात? ना s ही
मग कोण आहात? माणु s स
'गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला !!
गाडगेबाबा लोकमनातून जातीचे खूळ काढण्यासाठी कीर्तनातून सांगत असत,
तुमची आमची गंगा एक की दोन ?

ए s क

हे इकडून निघाली मराठयाची नदी, ती मांगाची नदी आली तिकडून, असं आहे कां ?

ना s ही

गाडगेबाबा मानवतानिष्ठ संत होते. एक जाणते समाजसुधारक होते. जाती-जाती मधील कलह निरर्थक असतात हे साध्या शब्दातून समाजाला पटवून देत असत. खरे तर जो पर्यंत समाजात दलितवर्ग आहे, तो पर्यंत मी त्यातलाच एक आहे, जो पर्यंत समाजात अपराधी आहेत, तोपर्यंत मी त्यातलाच एक आहे आणि जो पर्यंत एक जरी आत्मा बंधनात खितपत पडला असेल तो पर्यंत मी देखील स्वतंत्र नाही, अशी बाबांची भूमिका होती. या भमिकेतूनच बाबांच्या मनात समतेचा सूर्य उगवला.

व्यसनमुक्त समाज - देशाचे भूषण :

श्रम प्रतिष्ठा हा गाडगेबाबांच्या समाजप्रबोधनाचा महत्त्वा विषय होता. बाबांचा झाडू श्रमप्रतिष्ठेचे प्रतिक होता. माणसांचे घामाने डबडबलेले शरीर हाच जीवनाचा खरा अलंकार असतो. आपल्या पायाखाली डांबरी रस्ता तयार करणारे मजूर आणि मोत्यासारखे धान्य पिकविणारे शेतकरी हे तर श्रमाचे खरे पुजारी असेल माझा हरी तर देईल खाटल्यावरी' या दैववादी विचाराला विरोध करून 'जेथे राबती हात तेथे हरी' हा विचार बाबांनी लोकमनात रुजवला. स्वच्छता हा तर बाबांचा परिपाठ होता. 'बाबांचा खराटा' हा श्रमप्रतिष्ठेचा अलंकार होता. श्रमप्रतिष्ठेतून बाबांना समाजाचे वैभव वाढवायचे होते. त्यासाठी स्वत:च एक उदाहरण म्हणून ते समाजापुढे उभे ठाकलेले होते. बाबांचे हात चंदनाचे होते. पायही चंदन होते. बाबांचे हात जेथे लागतात,तेथे स्वच्छतेचा मळा बहरतो. बाबांचे पाय जिथे लागतात तिथे समृद्ध जीवनाची नवी वाट फुटते. लोकजीवन सुंदर आणि समद्ध करण्यासाठी बाबांनी व्यसनमुक्तीसाठी समाजाला नवी साद घातली. ऋणमुक्ती, दारिद्र्यमूक्ती, जीवनमुक्ती आणि व्यसनमुक्ती या चार मुक्तिधामांचे प्रवासी होते 'गाडगेबाबा!'

तळागाळातील माणसे व्यसनाधीन होतात आणि तळागाळात बुडून जातात. समाजातील एक वर्ग कष्ट करून सुखाने जगतो, तर दुसरा वर्ग कष्ट करून दु:ख ओढवून घेतो. ही दोन चित्रे पाहू नबाबा कीर्तनातून सांगतात कीं, " हे दारू पिणारे मुर्दाड मराठा, माळी, तेली, न्हावी, धोबी, चांभार, कोळी, कोष्ठी, कुंभार, लोहार कैकाडी, गवंडी, इणकर, धनगर, मांग, अन् महार"

मारवाडी दारू पिऊन बंबईत पडला पाहिला कां? नाही ! गुजराती दारू पिऊन बंबईत पडला पाहिला कां? नाही, ब्राम्हण दारू पिऊन कचेरीत पडला पाहिला कां? नाही ! जे जे दारू पितील त्यांचा खाना खराब झाल्याविने कधी राहणार ना ss ही !!

कोणतही व्यसन हे समाजाच्या अधोगतीचे लक्षण असते. निर्व्यसन हे समाजाच्या विकासाचे साधन असते. निर्व्यसनाने मनुष्य लक्षाधीश होतो. व्यसनाने भिक्षाधीश होतो, पशू बनतो. ही गोष्ट सांगताना बाबा म्हणत-

"बाप दारू पिऊन सापडला तर त्याला असा बडवा की त्याच्या बापाच्या बापाने पाहिले नसेल, असा त्याला थंड करा. अन् विचारा त्याला, म्हणावे दारु सोड, सोडणार कां पेणार? पेशील का सोडली? मंग सोडून द्या. दारु पिईल तो बाप नाही. लाखो धन्यांनी आपल्या अजाच्या बापाच्या जमिनी पार गमावल्या. हमाली करून राहिले, हमाली !!"

काम, मोह आणि लोभ हे तीन विकार व्यसनाच्या पाऊलवाटेने माणसाला विनाशाकडे घेऊन जातात. म्हणून व्यसनमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी बाबांनी आयुष्यभर काम केले.

समाजप्रबोधनाचे फिरते विद्यापीठ :-

गाडगेबाबा समाजप्रबोधनाच्या वाटा आयुष्यभर उजळत राहिले. लोकशिक्षण, अंधश्रद्धा - निर्मूलन, श्रमनिष्ठा, अस्पृश्यता निवारण, दलित संवेदन आणि व्यसनमुक्त समाज निर्मितीसाठी अखंड 50 वर्षे धडपडत राहिले. खरे तर गाडगेबाबा म्हणजे समाजप्रबोेधनाचे एक चालते-बोलते, फिरते विद्यापीठ होते. माणूसकीच्या भावनेने ओथंबलेले हे विनाअनुदानित विद्यापीठ होते. 'माणसाने माणसासारखे जगावे हाच बाबांच्या समाजप्रबोधनाचा केंद्रबिंदू होता.

संदर्भ सूची :

1. श्री. गाडगेमहाराज गौरव ग्रंथ-संपा. प्रा.रा.तु.भगत, चैतन्य प्रकाशन कोल्हापूर.
2. श्री.संत गाडगे महाराज - मधुकर केचे, अमरावती.
3. गाडगेबाबांची पत्रे - संपा प्रा.रा.तु.भगत, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर.
4. संत गाडगेमहाराज - प्रबोधनकार केशवराव ठाकरे, मुंबई.
5. लोकसंत गाडगेमहाराज -संपा. प्रा.रा.तु.भगत, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर.
6. श्री गाडगे महाराज - गो. नी. दांडेकर, पुणे.
7. गाडगेबाबांचा संदेश - प्रा.रा.तु.भगत, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर.
8. घरोघरी गाडगेबाबा - प्रा.रा.तु.भगत, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर.
9. गाडगेबाबांची काठी - प्रा.रा.तु.भगत, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर.
10. संत गाडगे महाराज स्मारक ग्रंथ-संपा- प्रा.रा.तु.भगत, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर.